**प्रेस नोट** **दिनांक २६/०३/२०१९**

## वारजे माळवाडी पोलीस स्टेशन पुणे शहर

## दोन तासात मिसिंग झालेल्या ३ वर्षाच्या मुलीच्या चुलतीचा शोध

दि २३/०३/१९ रोजी १६.३० वा चे सुमारास कर्वेनगर मार्शल डयुटीचे कर्मचारी पो.शि. काटकर यांना कर्वेनगर चौकात हॉटेल कोळीवाडा समोर एक ३ वर्षाची मुलगी रडत असताना मिळून आली. तिचे बाबत आजुबाजूस तिच्या आई वडिलांचा अगर नातेवाईकांचा शोध घेतला असता, सदर मुलीचे कोणीही नातेवाईक मिळून आले नाहीत. म्हणून पो.शि. काटकर हे सदर मुलीस कर्वेनगर पोलीस चौकीस घेऊन अआले. तेथे त्यांनी दामिनी मार्शलच्या कर्मचारी म.पो.शि. केंद्रे यांना मदतीसाठी बोलावून घेऊन मुलीकडे तिचे नाव पत्ता याबाबत चौकशी केली असता, तिला काही बोलता येत नव्हते. म्हणून त्यांनी तिचा फोटो मोबाईल मध्ये काढून घेऊन सदरचा फोटो घेऊन त्यांनी कर्वेनगर पोलीस चौकीचे हद्दीत मुलीच्या नातेवाईकांचा शोध घेण्यास सुरूवात केल्यावर सांयकाळी १८.३० वा चे सुमारास त्यांना वडार वस्ती, कर्वेनगर येथे सदर मिळून आलेल्या मुलीची चुलती नामे गंगूबाई पवार हया मिळून आल्या त्यांनी फोटो पाहून फोटोतील मुलगी ही त्यांची पुतणी असल्याचे सांगून तिचे आई वडिल मजुरी कामासाठी गेले असल्याचे सांगितले. सदर बाबत खात्री करून मिळून आलेल्या मुलीला त्यांच्या ताब्यात देण्यात आले आहे. कोणतीही तक्रार दाखल होण्यापूर्वी मिसिंग झालेल्या ३ वर्षाच्या मुलीस २ तासात तिच्या चुलतीच्या ताब्यात दिल्याने मुलीच्या आई वडिलांनी कामावरून आल्यावर चौकीला येऊन पोलीसांचे आभार मानले आहेत.

